# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 30/01/2021 (शनिवार)
(सायंकाळ)

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
### एकुण 30,35,000/-रू. चा मुद्देमाल जप्त
### स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

दिनांक 28/01/2021 रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हे पोलीस स्टेशन केळवद परिसरात पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मौजा खुर्सापार ते उमरी बिहाडा फाटा येथे जावून नाकाबंदी करुन एम. पी.- 04/एचई - 9805 क्रमांकाच्या टाटा कंटेनर या वाहनाला थांबवुन त्याची तपासणी केली असता त्यामध्ये एकुण 59 (गोवंश,बैल,गोरे) कि. 10,35,000/-रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. त्यापैकी 1 बैल मृत अवस्थेत आढळुन आला. आरोपी नामे- 1) इलियास जमाल्लुदीन, वय 25 वर्ष, रा. प्रंसेडा ता साहीबाबा सिटी जि गाजीयाबाद (यूपी) ह.मू लखनौवती ता नखूर सरहानपूर पो.स्टे गंगोह (यूपी), 2) वाहक नामे- अफजल खान अनवर, वय 23 वर्ष, रा. वार्ड क 18 लक्ष्मी नारायन नगर ता बेरसीया ति भोपाल(मप्र), 3) वसीम खान सहीद खान, वय 27 वर्ष, रा ग्राम भेरासा ता बेरसीया ति भोपाल (मप्र), 4) शकील अब्दुल रहमान कुरेशी, वय 34 वर्ष रा. हवेली मोहगाव मज्जीद जवळ ता सौसर (मप्र) व 5) मोबीद खान खलीद खान, वय 19 वर्ष, रा. मज्जीद जवळलायरा ता कोरबाई जि विदीशा (मप्र) यांच्या ताब्यातुन वाहनासह एकुण किंमती 30,35,000/- रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे सहायक पोलीस निरीक्षक श्री. राजीव कर्मलवार, स्थानिक गुन्हे शाखा नाग्रा यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे वरील आरोपीतांविरुध्द अप क 20/2021 कलम 439, 279.109, 34 भादवी सहकलम 11 (1)(घ)(ड)(च) प्राण्याना निर्दयतेने वागवने प्रति अधि. महाराष्ट्र 1960 सहकलम 5(अ), 9 महाराष्ट्र प्राणी सरक्षण अधनियम 1995 सहकलम 119 महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 सहकलम 192 (अ) 179 184 मोवाका काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार श्री. पवार 9823225538 हे करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. राकेश ओला, अप्पर पोलिस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर यांचे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार, सपोनि श्री राजीव कर्मलवार, पोहवा गजेन्द्र चौधरी, चंद्रशेखर घडेकर, पोना राजेन्द्र रेवतकर, महेश जाधव, पोशी रोहण डाखोरे यांनी केलेली आहे.



## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
## एकुण 20,25,000/–रू. चा मुद्देमाल जप्त

पो.स्टे. केळवद :– अंतर्गत मौजा खुर्सापार ते उमरी बिहाडा फाटा येथे दिनांक 28/01/2021 चे 15.45 वा. दरम्यान केळवद पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन केळवद पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.– 38/यु – 7865 क्रमांकाच्या टाटा कंटेनर या वाहनाला थांबवुन त्याची तपासणी केली असता त्यामध्ये एकुण 59 (गोवंश,बैल,गोरे) कि. 8,85,000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. त्यापैकी 1 बैल मृत अवस्थेत आढळुन आला. आरोपी नामे– 1) जाहीद उर्फ शाहरूख, वय 26 वर्ष, रा. वार्ड क 24 दलोरा ता जि मनसोर (मप्र,) 2) चांद मोहम्म्द सकूर खां, वय 35 वर्ष, रा. वार्ड क 02 इंदिरा कॉलनी झोपटपटटी ता जि मनसोर, (मप्र) 3) नदिम रा. मुरादाबाद उत्तरप्रदेश (वाहनमालक) व 4) आरीफ सोडा रा. मुलतानपूर ता जि मनसोर मध्यप्रदेश (जनावर मालक) यांच्या ताब्यातुन वाहनासह एकुण किंमती 23,85,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नाईक श्री. रविन्द्र चटप, पो.स्टे. केळवद यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे वरील आरोपीतांविरुध्द अप क 19/2021 कलम 425, 279,109,34 भादवी सहकलम 11 (1)(घ)(ड)(च) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 119 महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 तसेच कलम 192(अ) 179,184 मोवाका कादयान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री. दिलीप ठाकुर 9823225538 हे करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. राकेश ओला, अप्पर पोलिस अधीक्षक श्रीमती मोनिका राउत, उपविभागिय पोलिस अधिकारी सावनेर श्री. अशोक सरंबळकर यांचे मार्गदर्शनात ठाणेदार पोनि श्री दिलीप ठाकुर, पोउपनि अर्जुन राठोड, पोशी सचिन येलकर, रविन्द्र चटप व चालक गुणेश्वर डाखोळे यांनी केलेली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर